NAAC A++ Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय :— पीएच.डी. विद्यार्थ्यांना नांवनोंदणी पत्र देणेबाबत कार्यवाहीसंदर्भात

सर्व संबंधितांना कळविणेत येते की, एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित होणा—या विद्यार्थ्यांबाबत प्रवेशाची प्रक्रिया व नावनोंदणीची कार्यवाही विविध **(DRC/CRC, RAC, RRC)** समित्यांमार्फत तसेच विविध विभागांमार्फत पूर्ण करण्यात येवून, त्यानंतर सदर विद्यार्थ्यांना नांवनोंदणी पत्र देण्यात येते. सदर कार्यवाहीची पूर्तता करत असताना, मार्गदर्शक नियुक्तीनंतर विद्यार्थ्यांचे संशोधन सल्लागार समितीमार्फत सिनॉपसिस सादरीकरण, पात्रता अर्ज भरून घेवून पात्रता पूर्ण करणे, त्यानंतर संशोधन व मान्यता समितीची बैठक आयोजित करून, सदर समितीची मान्यता घेणे व त्यानंतर नावनोंदणी पत्र देणे या प्रक्रियेमध्ये बराच कालावधी जात असल्याचे दिसून येत आहे.

तेव्हा उपरोक्त कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने संबंधित विभाग, अधिविभाग व विद्यार्थी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१. संबंधित विषयाच्या डीआरसी व सीआरसी यांनी एम.फिल./पीएच.डी. प्रवेश परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर, १५ दिवसात मार्गदर्शक नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करून, विद्यार्थ्यांना ई—मेल व्दारे प्रोव्हिजनल प्रवेश पत्र पाठवावे.

२. तेथून पुढे संबंधित विद्यार्थ्यांनी सिनोपसिस, पात्रता अर्ज, फी व अन्य कागदपत्रे संबंधित अधिविभागास/विभागास एक महिन्याच्या आत सादर करावीत. जे विद्यार्थी एक महिन्यात वरील कागदपत्रांची पूर्तता करणार नाहीत, त्यांचे प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाहीस विलंब झाल्यास याबाबत विद्यापीठ कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. तेव्हा विद्यार्थ्यांनी नियोजित कालावधीत सिनॉपसिस सादर करणे, पात्रता अर्जाची पूर्तता करणे (विहित शुल्कासह), सुधारित सिनॉपसिस सादर करणे इत्यादी कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांना याबाबत डीआरसी/सीआरसी मार्फत देखील सूचना देण्यात याव्यात.

३. पात्रता विभागाकडून एम.फिल./पीएच.डी. विद्यार्थ्यांची पात्रता तातडीने पूर्ण होणेबाबत कार्यवाही आवश्यक आहे. तेव्हा पात्रता विभागाने सदर विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज सादर झाल्यापासून एक महिन्यात पात्रता पूर्ण करणे व तसे पीजीबीयुटीआर विभागास त्वरित कळविणे आवश्यक आहे.

४. संबंधित अधिविभागातील संशोधन सल्लागार समितीसमोर (आरएसी) विद्यार्थ्यांने सिनॉपसिस सादर केल्यानंतर, एक महिन्यात सिनॉपसिस मंजूरीची प्रक्रिया पूर्ण करणे व तसे पीजीबीयुटीआर विभागास त्वरित कळविणे आवश्यक आहे.

५. संबंधित अधिविभाग यांचेकडून सिनॉपसिस मंजूरीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, पीजीबीयुटीआर विभागाने संशोधन व मान्यता समितीच्या मंजूरीने विद्यार्थ्यांना नावनोंदणी पत्र देण्याची कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे.

तेव्हा सर्व संबंधितांनी वरील कामकाजाची पूर्तता खालील वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण करावी.

| | | |
|---|---|---|
| 1 | प्रवेश परीक्षा अंतिम गुणवत्ता यादी | **30th September** |
| 2 | डी.आर.सी./सी.आर.सी बैठक **(Guide Allotment and Provisional Admission Letter)** | **1st to 15th October** |
| 3 | **Submission of Eligibility Fee & Form** | **15th October to 15th November** |

| | | |
|---|---|---|
| 4 | **Submission of Synopsis** | **15 th October to 15 th November** |
| 5 | **Research Advisory Committee (Synopsis Approval)** | **15 th November to 15 th December** |
| 6 | **Revised/Approved Synopsis Submission to PGBUTR Section** | **15 th December to 31st December** |
| 7 | **Research and Recognition Committee Meeting for Synopsis Approval** | **1st January to 31st January** |
| 8 | **Registration Letter** | **1st February to 28th February** |

याची सर्व संबंधीतांनी व विद्यार्थ्यांनी नोंद घेवून सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

आदेशावरून,

कुलसचिव

जा.क्र. शिवाजी विद्या./पीजी—बीयुटीआर/एम.फिल—पीएच.डी./6215

दि. 21 AUG 2021

प्रत —

१. सर्व प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालय/मान्यता प्राप्त संस्था.
२. सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक, पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. मा. कुलगुरू कार्यालय, मा. प्र—कुलगुरू कार्यालय, मा. प्र—संचालक, परीक्षा व मूल्यमापन, मा. कुलसचिव कार्यालय.
४. प्र—संचालक, संगणक केंद्र.
५. विभागप्रमुख, पात्रता विभाग.
६. इंटरनेट विभाग यांना सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत योग्य त्या कार्यवाहीसाठी.

(महत्वाची सुचना : एम.फिल./पीएच.डी. विद्यार्थ्यांनी तसेच संबंधीत मार्गदर्शक यांनी पीजीबीयुटीआर विभागाशी निगडीत अधिकृत माहितीकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट दयावी. )